निशाणी क्र. ११

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी शपथेवर सुरू...**

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख-याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव : कृष्णा रावण ओव्हाळ,**
**वय** : २२ वर्षे,
**व्यवसाय** : शेती,
**पत्ता** : रा. नायगाव, ता. कळंब, जि. धाराशिव

**साक्षीदार क्र. ०१ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. टी. वैदय यांचे मार्फत**

१. दिनांक १४/०६/२०२५ रोजी शिराढोण पोलिसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. मी नायगाव शिवारातील रुद्रा हॉटेलच्या समोर थांबलो असताना पंचनाम्यावर सही घेतली. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. घटनास्थळ पंचनाम्यावरील अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीपुरता **निशाणी क्र.१२** देण्यात येतो.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, मला शिराढोण पोलिसांनी दिनांक १४/०६/२०२५ रोजी नायगाव ते मुरूड जाणारे रोडलगत नायगाव शिवारातील रूद्रा हॉटेलच्या पाठीमागील बाजूस उसाच्या शेतामध्ये पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व दुसरा पंच नामे सौरभ कबीर चव्हाण यांचेसह पोलीसांनी छापा मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एक इसम बेकायदेशीररीत्या विनापास परवाना दारू विक्री करत असताना मिळून आला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव दादाराव रामचंद्र घोगरे असे सांगितले. आरोपीचे ताब्यात १. देशी दारू एक धार संत्रा कंपनीच्या १८० मि.ली.च्या एकूण २४ सीलबंद प्लास्टीकच्या बाटल्या प्रत्येकी बाटली विक्री किंमत ७०/- प्रमाणे

१,६८०/- २. देशी दारू टँगो पंच कंपनीच्या ९ मि.ली. च्या ४७ प्लास्टीकच्या सिलबंद बाटल्या प्रति बाटली ३५/- प्रमाणे १,६४५/- ३. इंपेरीयल ब्लू कंपनीच्या १८० मि.ली. च्या १४ काचेच्या बाटल्या छापील किंमत १७०/- प्रमाणे २,३८०/- असे एकूण ५,७०५/- किंमतीचा मुद्येमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष १८० मि.ली.क्षमतेच्या पंचांच्या सहया असलेले लेबल असलेली एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढली. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझया ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. बी. एच. वाघमोडे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

सही/-

**दिनांक: १६.०७.२०२६**
**ठिकाण: कळंब**

**(अमृता डी. जाधव)**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**
**(कोर्ट क्र.३)कळंब.**